**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
**दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७** Email - ccrcs.general@gmail.com

जा.क्र.१५-सआ/सहकार पुरस्कार/२०२५ / १८०८ दि :- ०९/०७/२०२५

**प्रति,**

१. **विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था सर्व (प्रशासन/लेखापरीक्षण).**
२. **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).**
३. **जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (सर्व).**

**विषय- सन २०२३-२४ मधील सहकार पुरस्कार निकष.**

**संदर्भ-** १.कार्यासन अधिकारी १८-स यांचेकडील क्र.संकिर्ण ०५२५/प्रक्र.९०/१८-स दि.३/६/२०२५ चे पत्र.
२. या कार्यालयाचे जाक्र.१५-सआ/सहकार पुरस्कार/सन २३-२४/४५३ दि.१३/६/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.१ चे शासन पत्रान्वये सहकार पुरस्कार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वितरीत करावयाच्या पुरस्कारांबाबत पात्र संस्थांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सहकार पुरस्कार संदर्भात शासन निर्णयामध्ये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.) या सूचनांनुसार सहकार पुरस्कारासाठी सहकारी संस्थांचे प्रस्ताव मागविणे, छाननी करणे, मुख्यालयास सादर करणे, मुख्यालय स्तरावरील समितीने शिफारसपात्र संस्थांची यादी तयार करुन शासन स्तरावरील समितीस सादर करणे याबाबतचा कालबध्द कार्यक्रम संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये कळविण्यात आला आहे.

सहकार पुरस्कार सन २०२३-२४ चे अनुषंगाने संस्थाप्रकार निकष व गुणांकन याची माहिती सहकार आयुक्तालयाच्या http://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर **'महत्वपूर्ण कार्यक्रम'** या टॅबवर 'पुरस्कार व कामगिरी' येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम , १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या ज्या सहकारी संस्थांचे प्रस्ताव सहकार पुरस्कारासाठी आपणाकडे दाखल होणार आहेत व आपल्यामार्फत छाननी होऊन पुढील स्तरावर सादर केले जाणार आहेत अशा संस्थांची राष्ट्रीय सहकारी डेटाबेस (National Cooperative Database) या पोर्टलवर सन २०२३-२४ या वर्षाची माहिती अदययावत असणे आवश्यक आहे. सबब ज्या संस्थांची NCD पोर्टलवर सन २०२३-२४ या वर्षाची माहिती अदययावत नाही अशा संस्थांचे प्रस्ताव पुरस्कारासाठी सादर करताना या संस्थांची NCD पोर्टलवरील सन २०२३-२४ या वर्षाची माहिती अदययावत करुनच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

**(श्रीकृष्ण वाडेकर)**
**अपर निबंधक (पतसंस्था),**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत उचित कार्यवाहीस्तव-**

१. अपर निबंधक, (प्रशासन), (तपासणी व निवडणुका),(लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे.
२. कार्यासन अधिकारी (सर्व) मुख्यालय पुणे.
३. खाजगी सचिव कक्ष, मुख्यालय पुणे.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
**दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७** **Email - ccrcs.general@gmail.com**

---

जा.क्र.१५-सआ/सहकार पुरस्कार/सन२३-२४/२०२५/१४५३ दि :-१३/६/२०२५

**प्रति,**

१. **विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था सर्व (प्रशासन/लेखापरीक्षण).**
२. **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).**
३. **जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (सर्व).**

**विषय- सन २०२३-२४ मधील सहकार पुरस्कार वितरण.**

**संदर्भ-** कार्यासन अधिकारी १८-स यांचेकडील क्र.संकिर्ण ०५२५/प्रक्र.९०/१८-स दि.३/६/२०२५ चे पत्र. (सोबत प्रत)

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रान्वये सहकार पुरस्कार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वितरीत करावयाच्या पुरस्कारांबाबत पात्र संस्थांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सहकार पुरस्कार संदर्भात शासन निर्णयामध्ये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.) या सूचनांनुसार सहकार पुरस्कारासाठी सहकारी संस्थांचे प्रस्ताव मागविणे, छाननी करणे, मुख्यालयास सादर करणे, मुख्यालय स्तरावरील समितीने शिफारसपात्र संस्थांची यादी तयार करुन शासन स्तरावरील समितीस सादर करणे या बाबतचा कालबध्द कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कार्यवाहीचा दिनांक/ कालावधी | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे कार्यालय | प्रस्तावांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | दि.१/७/२०२५ | सहकार पुरस्कार सन २०२३-२४ कार्यक्रमास प्रसिध्दी देणे. | जिल्हा उपनिबंधक (सर्व) | - |
| २ | दि.२/७/२०२५ ते १८/७/२०२५ | सहकारी संस्थांनी आपले पुरस्कारासाठीचे प्रस्ताव ज्या तालुक्यात त्यांचे मुख्यालय आहे त्या तालुक्याचे तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांचेकडे सादर करणे.<br>१) जिल्हा स्तरावर गट नियम/प्रकार नियम किमान १० संस्थाचे प्रस्ताव आवश्यक<br>२) संस्थेचा प्रस्ताव दाखल होत असतांना आवश्यक ती सर्व कागद पत्रे सोबत असल्याची खात्री करावी. अपूर्ण कागदपत्रे पूर्ण करुन घेणे बाबत संबधितांना मार्गदर्शन करावे. | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक | - |
| ३ | दि.२१/७/२०२५ ते दि.३०/७/२०२५ | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांनी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे छाननी करुन प्रस्ताव सादर करणे | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक | सहा.निबं. यांचे कडून प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव |

| अ. क्र. | कार्यवाहीचा दिनांक/ कालावधी | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे कार्यालय | प्रस्तावांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ४ | ३१/७/२०२५ ते ८/८/२०२५ | जिल्हा उपनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांचेकडे सादर करणे | जिल्हा उपनिबंधक | १:४ |
| ५ | दि.११/८/२०२५ ते २५/८/२०२५ | विभागीय सहनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे | विभागीय सहनिबंधक | १:३ |
| ६ | दि.२६/८/२०२५ ते १२/९/२०२५ | सहकार आयुक्त स्तरावरील समितीने प्रस्ताव छाननी करुन शासनाकडे पाठविणे | सहकार आयुक्त | १:२ |
| ७ | दि.१५/९/२०२५ ते २६/९/२०२५ | शासन स्तरावरील मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पुरस्कार प्राप्त संस्थांची अंतिम निवड करणे | - | - |
| ८ | शासन मान्यतेने दिनांक घेणे. | पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन व पुरस्कारांचे वाटप | - | - |

या कामासाठी आपल्या कार्यालयातील एका जबाबदार अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी. नोडल अधिकाऱ्यांनी कार्यालय प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव मागविणे व प्रस्ताव छाननी करुन विहित मुदतीत वरिष्ठ कार्यालयास सादर करण्याचे काम करावे.

प्रस्तावांची छाननी करुन शिफारस करण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भानुसार व त्याअनुषंगाने निश्चित केलेले भाग -अ, भाग-ब व भाग-क प्रमाणे छाननी निकष व मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज करावे व कोणतेही विवाद उपस्थित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सर्व प्रस्ताव कार्यालय प्रमुखाचे स्वाक्षरीने सादर करावेत. जेणे करुन शिफारस प्राप्त संस्थेच्या प्रस्तावाची संपुर्ण जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

**(दिपक तावरे भा.प्र.से)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत- कार्यासन अधिकारी- १८-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई-४०० ०३२.**

**प्रत उचित कार्यवाहीस्तव-**

१. अपर निबंधक, (प्रशासन), (पतसंस्था) (तपासणी व निवडणुका),(लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे.
२. कार्यासन अधिकारी (सर्व) मुख्यालय पुणे.
३. खाजगी सचिव कक्ष, मुख्यालय पुणे.

१८१/C

**सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करणा-या संस्थांना**
**पुरस्कार देऊन सन्मानित करणेबाबत**

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र.सीसीआर १४०८/प्र.क्र.४६२/२-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० एप्रिल, २०१२

**प्रस्तावना :**

सन १९०४ च्या सहकारी संस्थांच्या कायद्यामुळे सहकारी चळवळीला भारतात तेव्हापासून कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले आहे. सहकार कायद्याची व्याप्ती वेळोवेळी वाढविण्यात आली व सुधारीत कायदे करण्यात आले. सन २००४ मध्ये भारतातील सहकारी चळवळीला शंभर वर्षे पूर्ण झाली.

देशातील सहकारी चळवळीच्या विकासात महाराष्ट्र राज्याचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. या चळवळीने राज्यातील आर्थिक व सामाजिक विकासावर सकारात्मक व दूरगामी परिणाम झालेला आहे. चळवळीच्या या यशात सहकार क्षेत्रात काम करणारे लोकप्रतिनिधी, संस्थांचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग आहे. त्यांच्या निःस्वार्थ सेवेमुळेच सहकारी संस्थांनी आपापल्या क्षेत्रात यश संपादन केलेले आहे.

सहकारी चळवळीच्या विकासात ज्या सहकारी संस्थांनी आतापर्यंत महत्वाचे योगदान केलेले आहे व करीत आहेत त्यातील उत्कृष्ट सहकारी संस्थाना त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात यावे असा शासनाचा मानस आहे. यामुळे पुरस्कार प्राप्त सहकारी संस्था भविष्यात अधिक चांगले काम करण्यास प्रेरीत व प्रोत्साहित होतील आणि इतर सहकारी संस्था या उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांचे अनुकरण करण्यासाठी प्रोत्साहीत होतील.

वरील संदर्भात राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या सहकारी संस्थांना पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव करण्यासाठी शासनाने पुढील प्रमाणे एक योजना लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :**

१. राज्यातील सहकारी क्षेत्रात उत्कृष्ट काम करीत असलेल्या आणि सहकारी चळवळीच्या निकोप वाढीसाठी योगदान करीत असलेल्या सहकारी संस्थांचा सहकार महर्षी (पुरस्कार संख्या-१), सहकार भूषण (पुरस्कार संख्या-१०), सहकार निष्ठ (पुरस्कार संख्या-२०) या प्रमाणे एकूण ३१ सहकारी संस्थांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्हे प्रदान करुन त्यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यास व या संबंधीच्या प्रस्तावित कार्यपध्दतीस शासन या शासन निर्णयाद्वारे मान्यता देत आहे.

२. या पुरस्कारांबाबतचा तपशिल व कार्यपध्दती, सोबतचे परिशिष्ट-१ प्रमाणे राहील. तसेच पुरस्कारपात्र संस्था निवडीचे निकष स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

१९०१C

३. या पुरस्कारांसाठी पात्र संस्थांची अंतिमरित्या निवड करुन मान्यता देण्यासाठी मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे "पुरस्कार पात्र संस्था अंतिम निवड व मान्यता समिती" गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री (सहकार) | समिती प्रमुख |
| २ | मा. मंत्री (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ३ | मा. मंत्री (पदुम) | सदस्य |
| ४ | मा. मंत्री (पणन) | सदस्य |
| ५ | मा. राज्यमंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ६ | सचिव, सहकार | सदस्य |
| ७ | सहकार आयुक्त व निबंधक, स.सं.,म.रा., पुणे. | सदस्य-सचिव |

पुरस्कारासाठी निवडलेल्या संस्थांना स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख पुरस्कार प्रदान करण्यासाठी समारंभाचे आयोजन करणे यासाठी येणारा संपूर्ण खर्च हा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्या त्या वर्षीच्या उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवावा. पुरस्कारासाठी निवड झालेल्या संस्थांचे प्रतिनिधींना पुरस्कार प्रदान समारंभासाठी उपस्थित राहण्यासाठी प्रवास व दैनिक भत्ते, विभागाचा समारंभ आयोजन करण्यासाठी प्रतिवर्षी आवश्यक असलेला खर्च वित्त विभागाचे शासन निर्णय१)क्र.टीआरए १०७७/१५६-सी/एसईआर-५ दि.११/०८/१९७७ व २) क्र. टीआरए १४७७/१०३२-सी/एसईआर-५, दि.२३/०९/१९७७ नुसार सहकार आयुक्त यांचे स्तरावरुन करावयाचा असुन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून व लेखाधिकारी , सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.,पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून जाहिर करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या सहमतीने विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३९/११/व्यय-२, दिनांक १९-०९-२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०४२०१४५८१८४१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( एस.बी. पाटील )
सह सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

19/C

प्रति :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री (सहकार व पणन / पदुम /वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (सहकार /वित्त / वस्त्रोद्योग / पणन / प.दु.म./उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. आयुक्त (पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रनिर्माण, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व).
१६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१७. जिल्हा विशेष लेखापरीक्षक-वर्ग-१, सहकारी संस्था (सर्व).
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१९. सह सचिव / उप सचिव / अवर सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग विभाग, प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती २ – स कार्यासन

## शासन निर्णय क्र.सीसीआर १४०८/प्र.क्र.४६२/२-स, दिनांक २० एप्रिल ,२०१२ चे जोडपत्र

### परिशिष्ट-१

१) **योजनेचे नांव** - महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीत उत्कृष्ट कार्य करित असलेल्या सहकारी संस्थांना पुरस्कार प्रदान करणे.

२) **योजनेचे स्वरुप** -

१) सहकार महर्षी, सहकार भूषण व सहकार निष्ठ या नावाने सहकारी संस्थांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येईल.

२) (अ) **सहकार महर्षी** (पुरस्कार संख्या-१)राज्यातील कामकाजात सर्वोत्कृष्ट म्हणुन निवडलेल्या फक्त एका सहकारी संस्थेस हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

(ब) **सहकार भूषण** (पुरस्कार संख्या-१०) हा पुरस्कार राज्यातील प्रत्येक विभागातून प्रत्येकी एक या प्रमाणे कामकाजात उत्कृष्ट म्हणून निवडलेल्या एकूण ९ विभागातील सहकारी संस्थांना प्रदान करण्यात येईल. तसेच एक पुरस्कार राज्यस्तरीय सहकारी संस्थेला प्रदान करण्यात येईल.

(क) **सहकार निष्ठ** (एकुण पुरस्कार संख्या-२०) हा पुरस्कार राज्यातील प्रत्येक विभागातून प्रत्येकी २ या प्रमाणे ९ विभागातून त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामासाठी निवडलेल्या एकूण १८ सहकारी संस्थांना प्रदान करण्यात येईल. तसेच दोन पुरस्कार राज्यस्तरीय संस्थांना देण्यात येतील.

| अ. क्र. | पुरस्काराचे नांव | पुरस्कारांची संख्या | पुरस्कारांची पात्रता | पुरस्कारांचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | सहकार महर्षी | १ | **संस्था** :- संपूर्ण राज्यात सर्वोत्कृष्ट कामकाज करणारी म्हणून निवड झालेली सहकारी संस्था. | **संस्था** :-१) रु. एक लाख रोख रकमेचा धनादेश<br>२)स्मृतीचिन्ह<br>३)प्रशस्तीपत्र |
| २ | सहकार भूषण | १० | **संस्था** :- प्रत्येक विभागातून उत्कृष्ट कामकाज करणारी म्हणून निवड झालेली प्रत्येकी एक सहकारी संस्था व राज्यस्तरीय सहकारी संस्थांमधून निवड झालेली एक सहकारी संस्था. | **संस्था** :-१) रु. ५१ हजार रोख रकमेचा धनादेश<br>२)स्मृतीचिन्ह<br>३) प्रशस्तीपत्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | सहकार निष्ठ | २० | **संस्था** - प्रत्येक विभागातून उत्कृष्ट कामकाज करणारी म्हणून निवड झालेल्या प्रत्येकी दोन सहकारी संस्था व राज्यस्तरीय संस्थांमधून निवड झालेल्या दोन सहकारी संस्था. | **संस्था** -१) रु. २५ हजार रोख रकमेचा धनादेश २)स्मृतीचिन्ह ३) प्रशस्तीपत्र |
| **एकूण** | | ३१ | | रु. ११,१०,०००/- |

४) **पुरस्कारासाठी शिफारस** :-

१. राज्यात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या व कार्यरत असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आपापले प्रस्ताव पुरस्कारासाठी दाखल करण्यास पात्र राहतील.

२. जिल्हा स्तरावर प्रशासन व लेखापरीक्षण विभागाचे अधिकाऱ्यांचा सहभाग असलेली छाननी समिती संबंधित विभागिय सहनिबंधक यांनी गठीत करुन प्रस्तावांच्या विहीत पध्दतीने छाननीनंतर सहकारी संस्थांचे शिफारस योग्य प्रस्ताव संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत विभागीय सहनिबंधक, प्रशासन या कार्यालयाकडे शिफारशीसह एकास चार या प्रमाणात सादर करतील.

३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे अधिनस्त असलेल्या संस्थांचे प्राप्त प्रस्ताव व इतर कार्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था यांचे स्तरावर गठीत केलेल्या (प्रशासन व लेखापरीक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा सहभाग असलेली) समिती मार्फत विहीत पध्दतीने सर्व प्रस्तावांची छाननी करुन शिफारस योग्य प्रस्ताव एकास तीन या प्रमाणात सहकार आयुक्त कार्यालयाकडे सादर करतील.

४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे अधिनस्त संस्थाचे व इतर कार्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव सहकार आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर गठित केलेल्या समितीने छाननी केलेले प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडून एकास दोन या प्रमाणात राज्य शासनाकडे सादर करतील.

५. राज्य शासनाकडे प्राप्त झालेले प्रस्ताव मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखालील अंतिम निवड समितीपुढे निवडीसाठी व मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

६. मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखालील समितीने अंतिमरित्या निवड केलेल्या व मान्यता दिलेल्या संस्थांना समारंभपूर्वक रोख पुरस्कार, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल.

७. जिल्हास्तरीय छाननी समितीचे गठन संबंधीत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन) करतील.

८. विभागीय व राज्यस्तरीय छाननी समितीचे गठन सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे हे करतील.

९. संबंधीत सहकारी संस्थांनी पुरस्कारासाठी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना, जोडपत्रे, संस्थांच्या ठरावाचा नमुना, गुणपत्रिका इ. बाबी निश्चित करण्यासाठी दिनांक ६ जानेवारी २०१२ रोजी सचिव (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयात झालेल्या बैठकीत उपरोक्त कामासाठी विभागीय सहनिबंधक,स.स.,पुणे यांचे अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आलेले आहे. या समितीने पुरस्कारासाठी सहकारी

संस्थांचे निवडीसाठी पात्रतेबाबतचे निकष ठरविताना प्रामुख्याने संस्थेचे लेखापरीक्षण,लेखापरीक्षणाचा वर्ग/ दोष दुरुस्ती, सर्वसाधारण सभा, अफरातफर, चौकशी, आर्थिक व प्रशासकीय अनियमितता, दाखल असलेले फौजदारी / दिवाणी गुन्हे, नक्तमुल्य, नफा-तोटा, सभासद संख्या इ. बाबी विचारात घ्याव्यात.

१०. पुरस्कारासाठी पात्रतेचे निकष ठरविताना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तराबरील उपरोक्त समितीने पुढील बाबी विचारात घेऊन १०० गुणांची विगतवारी करावी.

(अ) भाग-१ - सर्वसाधारण घटक (५० गुण)

(ब) भाग-२ - संबंधित संस्थांच्या वर्गवारीनुसार तपशिल (३५ गुण)

(क) भाग-३ - संबंधित संस्थेने केलेली वैशिष्ठ्यपूर्ण व सामाजिक उपयुक्ततेची कामे (१५ गुण)

उपरोक्त भाग १, २ व ३ हे परिशिष्ट स्वरुपात या शासन निर्णयाचा भाग समजले जातील.

११. संबंधीत वर्षातील जून ते ऑगस्ट या कालावधीत संबंधीत संस्था त्यांचे निबंधकामार्फत प्रस्ताव सादर करतील आणि विभागीय / जिल्हा स्तरीय समिती प्राप्त प्रस्तावांची विहीत पध्दतीने छाननी करुन पुरस्कारासाठी शिफारस योग्य प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे सादर करतील.

१२. सप्टेंबर महिना अखेर प्राप्त प्रस्तावांची विहीत पध्दतीने छाननी करुन सहकार आयुक्त यांचे स्तरावरील समिती शिफारशीसह प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करील.

१३. ऑक्टोबर महिना अखेर शासनाकडे प्राप्त प्रस्तावांची विहीत पध्दतीने छाननी करुन नोव्हेंबर महिन्यात प्रस्ताव मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखालील समितीपुढे अंतिम निवड व मान्यतेसाठी सादर करण्यात येतील. मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखालील समिती पुरस्कारपात्र संस्थांचे निवडीबद्दल अंतिम निर्णय घेईल.

१४. संबंधीत संस्था प्रस्ताव तयार करताना मागील आर्थिक वर्ष (उदा.३१/०३/२०११) अखेरच्या आर्थिक पत्रकाचे आधारे प्रस्ताव तयार करुन सादर करतील. मात्र मा. मंत्री (सहकार) यांचे समितीसमोर अंतिम निवड व मान्यतेसाठी आलेल्या अंतिम प्रस्तावावर निर्णय घेताना लगतपूर्वीचे आर्थिक वर्ष (उदा.३१/०३/२०१२) अखेरचे आर्थिक पत्रकाचे आधारे निर्णय घेईल. संबंधीत संस्थांनी आपापले प्रस्ताव व आर्थिक पत्रके इ. पूरक माहिती प्रमाणित करुन वरिलप्रमाणे सादर केलेली असली पाहिजे.

१५. या पुरस्कारासाठी राज्यातील कार्यरत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे प्रस्ताव देखील विचारात घेतले जातील. त्यांनी आपले प्रस्ताव संबंधीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे मार्फत विहीत पध्दतीने सादर केले असले पाहिजे.

१६. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ अंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्था या पुरस्कारासाठी आवेदन करण्यास पात्र समजण्यात येणार नाही.

**********

**सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना पुरस्कार देऊन सन्मानित करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीसीआर-१४०८/प्र.क्र-४६२/२-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ११ ऑक्टोबर, २०१३

**वाचा -**

१) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.सीसीआर१४०८/ प्र.क्र.४६२ / २-स, दिनांक २० एप्रिल,२०१२.

२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. संवका/डी-१/सहकार पुरस्कार/४००/२०१३, दि. १५/६/२०१३.

**प्रस्तावना -**

देशातील सहकार चळवळीच्या विकासात महाराष्ट्र राज्याचे योगदान अनन्य साधारण आहे. या चळवळीचा राज्यातील आर्थिक व सामाजिक विकासावर सकारात्मक व दूरगामी परिणाम झालेला आहे. सहकार चळवळीच्या या यशात सहकार क्षेत्रात काम करणारे पदाधिकारी, सभासद, अधिकारी व कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग आहे.

राज्यातील सहकार चळवळीच्या विकासात ज्या सहकारी संस्थांनी महत्वाचे योगदान दिलेले आहे, त्यातील उत्कृष्ट सहकारी संस्थांना त्यांच्या योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करुन शासनामार्फत सन्मानित करण्यासंदर्भात दि. २० एप्रिल, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयाद्वारे पुरस्काराबाबतचा तपशील व कार्यपध्दती विषद करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार सहकार महर्षी (पुरस्कार संख्या-१), सहकार भूषण (पुरस्कार संख्या-१०), सहकार निष्ठ (पुरस्कार संख्या-२०) असे एकूण ३१ पुरस्कार देण्यास मंजूरी देण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व धनादेश अनुक्रमे रु. १.० लाख, रु. ५१,००० व रु. २५,०००, असे निश्चित करण्यात आले होते.

सन २०१२ या वर्षातील सहकार पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम दि. २ डिसेंबर, २०१२ रोजी बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमा दरम्यान काही गटातील सहकारी संस्थांच्या कामकाजाचे स्वरुप भिन्न असल्याने निकोप स्पर्धा होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेऊन पुरस्काराच्या निकषामध्ये आवश्यक ते बदल करण्यासंदर्भात सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. १५/६/२०१३ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रकारातील सहकारी संस्थांमध्ये निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने पुरस्काराच्या निकषामध्ये आवश्यक ते बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या सहकारी संस्थांना शासनामार्फत पुरस्कार देण्यासाठी विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची खालीलप्रमाणे ९ गटात विभागणी करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार/गट | एकूण पुरस्कार | सहकार भूषण | सहकार निष्ठ | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था | ६ | ३ | ३ | प्रत्येक महसूल विभागातून एक पुरस्कार |
| २. | नागरी पतसंस्था, ग्रामीण बिगरशेती पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्था | ६ | ३ | ३ | प्रत्येक महसूल विभागातून एक पुरस्कार |
| ३. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | ३ | १ | २ | एका महसूल विभागातून एक पुरस्कार |
| ४. | नागरी सहकारी बँका | ४ | २ | २ | एका महसूल विभागातून एक पुरस्कार |
| ५. | सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरणी, सहकारी दुध संघ | ६ | ३ | ३ | सहापैकी सहकारी साखर कारखान्यासाठी तीन पुरस्कार, सूतगिरणीसाठी एक पुरस्कार व दुध संघासाठी दोन पुरस्कार |
| ६. | गृहनिर्माण सहकारी संस्था | ५ | २ | ३ | कोकण महसूल विभागातून तीन व अन्य दोन महसूल विभागातून प्रत्येकी एक पुरस्कार |
| ७. | औद्योगिक संस्था, हातमाग व यंत्रमाग संस्था, उपसा सिंचन संस्था व इतर संस्था | ४ | २ | २ | प्रत्येक प्रकारातून एक पुरस्कार |
| ८. | फळेभाजीपाला संस्था, खरेदी विक्री संघ, प्रक्रिया संस्था व ग्राहक संस्था | ४ | २ | २ | प्रत्येक प्रकारातून एक पुरस्कार |
| ९. | प्राथमिक दुध उत्पादक संस्था, कुक्कुट पालन संस्था, मत्स्य पालन संस्था व पशु संवर्धन संस्था | ६ | ३ | ३ | सहापैकी दुध उत्पादक संस्थांना तीन पुरस्कार व अन्य संस्थांना प्रत्येकी एक पुरस्कार |
| १०. | राज्य स्तरीय पुरस्कार (सहकारमहर्षी) | १ | ० | ० | राज्य स्तरातून एक पुरस्कार |
| | **एकूण** | ४५ | २१ | २३ | |

२. राज्यातील कोंकण, पश्चिम महाराष्ट्र (उत्तर महाराष्ट्र व खानदेशसह), मराठवाडा व विदर्भ या सर्व भौगोलिक विभागातील सहकारी संस्थांना पुरस्काराची संधी मिळण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१. प्रत्येक प्रकारातून पुरस्कारासाठी निवडावयाच्या संख्येच्या दुप्पट संस्थांची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनास शिफारस करण्यात येईल.

२. गट क्रमांक १ व २ मधून प्रत्येक महसूल विभागातून सर्वाधीक गुण मिळालेल्या दोन संस्थांची शासनास शिफारस करण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल.

३. गट क्रमांक ३ मधून पुरस्कारासाठी मराठवाडा व विदर्भातून बँक पात्र न ठरल्यास या दोन महसूल विभागांपैकी जास्त गुण असलेल्या बँकेची “सहकार निष्ठ” या पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल.

४. गट क्रमांक ४ मधून मराठवाडा व विदर्भातून बँक पुरस्कारासाठी पात्र न ठरल्यास या दोन महसूल विभागापैकी सर्वाधीक गुण असलेल्या बँकेची चौथ्या क्रमांकासाठी निवड करण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल.

५. गट क्रमांक ५ मधून सहकारी साखर कारखान्यासाठी ३ पुरस्कार, सहकारी दुध संघासाठी दोन पुरस्कार व सहकारी सूतगिरणीसाठी १ पुरस्कार देण्यात येईल. या गटामधून मराठवाडा व विदर्भातील संस्था पुरस्कारास पात्र न ठरल्यास या तीन महसूल विभागातून सर्वाधिक गुण असणाऱ्या संस्थेची "सहकार निष्ठ" या पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल.

६. गट क्रमांक ६ मधून कोंकण महसूल विभागातून ३ पुरस्कार व अन्य महसूल विभागापैकी दोन महसूल विभागातून प्रत्येकी एका संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

७. गट क्रमांक ७ मधून प्रत्येक प्रकारच्या संस्थेस एक पुरस्कार देण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल. (उदा. औद्योगिक संस्था एका महसूल विभागातून पात्र ठरल्यास अन्य तीन प्रकारच्या संस्थांची निवड इतर महसूल विभागातून करण्यात येईल.)

८. गट क्रमांक ८ मधून प्रत्येक प्रकारच्या संस्थेस एक पुरस्कार देण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल. (उदा. फळे-भाजीपाला संस्था एका महसूल विभागातून पात्र ठरल्यास अन्य तीन प्रकारच्या संस्थांची निवड इतर महसूल विभागातून करण्यात येईल.)

९. गट क्रमांक ९ मधून सहा पुरस्कारांपैकी प्राथमिक दुध उत्पादक संस्थांना तीन पुरस्कार व अन्य तीन प्रकारच्या संस्थांना प्रत्येकी एक पुरस्कार देण्यात येईल. एका महसूल विभागातून पुरस्कारासाठी एकच संस्था निवडण्यात येईल.

१०. संस्थेस ज्या वर्षात पुरस्कार प्राप्त होईल त्यानंतरच्या पुढील दोन वर्षाकरिता या संस्था त्याच पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत.

११. पुरस्कारासाठी जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर सादर होणाऱ्या प्रस्तावांची छाननी व इतर कार्यपध्दती दि. २० एप्रिल, २०१२ च्या शासन निर्णयाच्या परिशिष्टाप्रमाणे राहिल.

३. पुरस्काराबाबतच्या वरील तपशिलानुसार एकूण ४५ पुरस्कारांसाठी पुरस्काराची रक्कम रु. १७.४६ लाख व पुरस्कार वितरण समारंभ खर्चासाठी रुपये २५ लाख अशा एकूण रु. ४५.४६ लाख खर्चास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. पुरस्कार वितरण समारंभ रु. २५ लाख या खर्चाच्या मर्यादेतच आयोजित करण्याची जबाबदरी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

४. वरील प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम रु.४२.४६ लाख (रुपये बेचाळीस लाख शेहेचाळीस हजार फक्त) एवढया रकमेचा खर्च मागणी क्र. व्ही-२, मुख्य लेखाशिर्ष २४२५-सहकार ००१, संचालन व प्रशासन , (०१)(०१) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, (२४२५ ००११) ५०- इतर खर्च (दत्तमत्त) या खाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. वरील रक्कम सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर उपलब्ध करण्यात येत असून त्यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या वतीने सदर रक्कम कोषागारातून काढून अदा करण्यास लेखाधिकारी , सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४७२/१३/व्यय-२, दि. २७/९/२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०१४१२०४१२२३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amolkar Vijay Ganpat

Digitally signed by Amolkar Vijay Ganpat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=CMTD, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Amolkar Vijay Ganpat
Date: 2013.10.14 12:20:58 +05'30'

**विजय अमोलकर**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन,मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
६. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
७. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
९. मा.राज्यमंत्री (सहकार व पणन / पदुम/वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१०. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
११. मा. विधान परिषद सदस्य / मा. विधानसभा सदस्य.
१२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय,मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सहकार/वित्त/वस्त्रोद्योग/पणन/प.दु.म/उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.
१४. सहकार आयुक्त व निबंधक , सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. साखर आयुक्त ,महाराष्ट्र राज्य ,पुणे.
१६. कृषी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. आयुक्त (पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१८. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रनिर्माण, महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१९. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरिक्षण) (सर्व).
२०. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
२१. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (सर्व).
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई.
२३. सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/कक्ष अधिकारी, सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभाग,
२४. उद्योग विभाग, प.दु.म विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. वेब को-ऑर्डीनेटर, स.प.व व.विभाग, मंत्रालय,मुंबई.
२६. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२७. कार्यासन २-स (निवड नस्ती ).